| वाचा | |
|---|---|
| १ | श्री.संपतराव नारायणराव देशमुख व इतर १, रा.मु.पो.पळसे, ता.नाशिक, जि.नाशिक यांचा अनाधिकृत अकृषिक वापर नियमित करणेकामी अर्ज दिनांक ०८.०३.२००६, दिनांक १४.०२.२००७, व दिनांक २०.०१.२०११. |
| २ | मंडळ अधिकारी, शिंदे, ता.जि.नाशिक यांचा स्थळ निरिक्षण अहवाल जा.नं./२३०/२००७ दिनांक ०१.०९.२००७ |
| ३ | सरपंच / ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय पळसे, ता.जि.नाशिक यांचेकडील नाहरकत दाखला दिनांक २५.०१.२००६ |
| ४ | वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र शिंदे, ता.जि.नाशिक यांचेकडील स्थळ पाहणी निरिक्षण अहवाल. |
| ५ | प्रबंधक बँक ऑफ इंडिया, ना.रोड शाखा यांचेकडील नाहरकत दाखला दि. १९.०१.२००६ |
| ६ | श्री.देशमुख संपतराव नारायणराव रा.नाशिक, ता.नाशिक यांचा विहीत नमुन्यातील करारनामा दि.२०.०३.२००६. |
| ७ | श्री.तुकाराम हरी गायधनी, व इतर २ सर्व राहणार पळसे, ता.नाशिक यांचे संमतीपत्र दि.०२.०२.२००६. |
| ८ | तहसिलदार नाशिक यांचेकडील अंतरिम आदेश क्र.जमा/अना.बि.शे./एसआर/ /२०११ दि.१२.०२.२०११. |
| ११ | श्री.संपतराव नारायणराव देशमुख व इ.१, रा.मु.पो.पळसे, ता.नाशिक यांचा दंड भरणे बाबतचा अर्ज दि.२७.०२.१२ |

उपविभागीय अधिकारी नाशिक
उपविभाग नाशिक यांचे कार्यालय
क्र.जमाबंदी/कावि/१२५/२०१२
नाशिक दिनांक :२९.०२.२०१२

## आदेश

मौजे पळसे, ता.नाशिक, येथील **ग.नं.१७ पैकी** १,५०० चौ.मी. क्षेत्रास वाणिज्य / निवासी प्रयोजनार्थ अनाधिकृत अकृषिक वापर नियमित करणेत येत आहे. ही मिळकत *श्री.संपतराव नारायणराव देशमुख व सौ.शोभा संपतराव देशमुख रा. मु. पो. पळसे, ता.नाशिक, जि.नाशिक* यांचे मालकीची आहे, वर नमुद केलेल्या मिळकतीपैकी **२३१.८९** चौ.मी. क्षेत्रात मिळकतधारक यांनी सन १९९७-९८ पासुन वाणिज्य प्रयोजनासाठी अकृषिक वापर करीत आहे.

सबब, महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४४ अन्वये परवानगी न घेता बिगरहुकमी अकृषिक वापर केल्याने सदरचे बांधकाम काढुन टाकल्यांस त्यांचे आर्थिक नुकसान होणार आहे. त्यामुळे सदरचे बांधकाम नियमित करुन मिळावे अशी विनंती जमिन मालकाने केली आहे. त्यावरुन उक्त कायदयाचे कलम ४५,४७ब, व ११४ सह नियम ८ व ९ नुसार सदरचे अनधिकृत बांधकाम वाणिज्य / निवासी प्रयोजनासाठी नियमित करण्यांत येत आहे.

| गांव | ग.नं. | क्षेत्र चौ.मी. | बिनशेती दर प्रति चौ.मी. रु.पै. | कालावधी | बिनशेती सारा रु.पै. | जि.प. सेस रु.पै. | पं.स. सेस रु.पै. | एकूण बिनशेती आकार रु.पै. | रु.३० प्रमाणे दंडाची रक्कम | एकूण भरावयाची दंडाची रक्कम रु.पै. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मौजे पळसे, ता. नाशिक | १७ | १५०० | ०.०२ | १९९७-९८ ते २००७-०८ =१२ वर्ष | ३६० | २५२० | ३६० | ३२४० | ० | ३२४० |
| | | | ०.१० | २००८-०९ ते २०१०-११ =३ वर्ष | ६०० | ४२०० | ६०० | ५४०० | ६०६० | ११४६० |
| | | | एकूण | | ९६० | ६७२० | ९६० | ८६४० | ६०६० | १४७०० |
| | | | | | | भरणा करावयाची रक्कम | | | | १४,७०० |

वरिल प्रमाणे बिनशेती सारा व दंड रक्कम अशी एकूण रक्कम रु. १४,७००/- दिनांक २७.०२.२०१२ रोजी तलाठी पळसे, ता.नाशिक यांचेकडे पावती क्र.२४४२७७० नुसार भरणा करुन पावती हजर केली आहे.

परवानाधारक यांनी जमीनीचा अकृषिक सारा दर चौ.मी. ला दर **रु.००.१०पै.** या प्रमाणे ज्या अकृषिक कारणसाठी परवानगी दिली आहे त्याच कारणासाठी आणल्याचे तारखेपासून भरावा. अकृषिक दर हा दिनांक ०१.०८.२००८ पासुन सुधारीत अकृषिक दराने येणाऱ्या फरकाची रक्कम भरण्याच्या अटीवर सदरची परवानगी देण्यांत येत आहे. तसेच भविष्यांत कोणत्याही प्रकारचे शासकीय येणे / नजराणा आढळल्यास ते भरणे परवानाधारक यांच्यावर बंधनकारक राहिल.

सदरचे आदेश खालील अटी व शर्तींना अधीन राहुन देण्यांत येत आहे.

१) सदरचे बांधकाम [illegible]

२) सदरचे बांधकाम ज्या प्रयोजनासाठी नियमित करुन देण्यांत आले त्यांच कारणांसाठी वापर करावा. अन्य कारणांसा वापर करावयाचा झालेस त्यांस सक्षम अधिकाऱ्याची पुर्व परवानगी घ्यावी.पुर्व परवानगी शिवाय वापर करु नये.

३) सदर जागेवरील बांधकाम हे सरकारी अगर निमसरकारी कामासाठी काढावे लागल्यांस त्याबाबत कोणत्याही प्रकारच नुकसान भरपाई मिळणार नाही.

४) मिळकत धारकाने सदर प्लॉटचा उपविभाग सक्षम प्राधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय करु नये.

५) सदर जागेवर नियमित करुन देण्यांत आलेल्या बांधकामा व्यतिरिक्त अतरिक्त बांधकाम करावयाचे झाल्यास त्यास सक्ष प्राधिकाऱ्याकडून बांधकाम नकाशे मंजुर करुन घ्यावे.

६) मिळकत धारकाने या आदेशा पासून एक महिन्याचे आंत आदेशात नमुद केलेल्या अटी व शर्तीवर अनधिकृत अकृषिव वापर नियमित केल्या बाबत महाराष्ट्र जमिन महसुल (जमिनीचे वापरात बदल आणि बिनशेती आकारणी) नियम १९ मधील फॉर्म सहा मध्ये कबुलायत (सनद) करुन दयावी.

७) सदरचा आदेश नागरी जमिन (कमाल मर्यादा व नियमन) अधिनियम १९७६ व मधील तरतुदींना अधिन राहुन देण्यां आला आहे.

८) महाराष्ट्र नगररचना अधिनियम व विकास आराखडा यातील तरतुद मिळकत धारकांवर बंधनकारक राहतील.

९) सदरचा आदेश हा वेळोवेळी अंमलात येणाऱ्या कायदया मधील तरतुदींना अधिन राहुन देण्यांत आलेला आहे.

१०) या आदेशातील कोणत्याही शर्त अगर अटींचा भंग झाल्यांस सदरचे बेकायदेशीर बांधकाम काढुन टाकण्यांत येईल.

११) परवानाधारक यांनी वाणिज्य / निवासी प्रयोजनासाठीच वापर करावा. वापरात बदल करावयाचा असल्यास सक्षम अधिकारीसह तद्संबंधी असलेल्या विभागाची परवानगी घेणे बंधनकारक राहील.

१२) परवानाधारक यांनी सदर जागेत कोणत्याही प्रकारचे बांधकाम करण्यापुर्वी सक्षम प्राधिकारी व तद्संबंधी विभागाचे परवानगी घेणे बंधनकारक आहे.

वरीलपैकी कोणत्याही अटी व शर्तीचा तसेच प्रचलित कायदा व नियमांचा भंग झाल्यास व चौकशी अंत सत्यता आढळुन आल्यास सदरची परवानगी रद्द करण्यास पात्र राहील.

उपविभागीय अधिकारी
नाशिक उपविभाग नाशिक

प्रति,

*श्री.संपतराव नारायणराव देशमुख,*
*सौ.शोभा संपतराव देशमुख*
*रा.मु.पो.पळसे, ता.नाशिक*